<u>नियमीत दरखास्त क्रमांक १०/२०२२ - निशाणी क्रमांक १३ खालील आदेश</u>

दत्तु धर्मा बाबर वि. सुभाष तुकाराम पाटील

CNR NO. MHSO20-001936-2022

प्रस्तुतचा अर्ज डी.एच. यांनी दाखल करुन कब्जे वॉरंट बजावणीकरीता कोर्ट बेलिफ यांना दोन पुरुष कॉन्स्टेबल व एक महिला कॉन्स्घ्टेबल यांचे पोलिस संरक्षण उपलब्ध करुन मिळण्याबाबत विनंती केली आहे.

२. डीएच यांच्या अर्जाप्रमाणे नि.१० प्रमाणे कब्जे वॉरंट बजावणी करीता बेलिफ गेले असता प्रतिवादी क्र.२ सुभाष तुकाराम पाटील यांनी कब्जे वॉरंट बजावणीकामी अडथळा निर्माण केल्यामुळे बेलिफ व मोजणी अधिकारी यांना अतिक्रमण केलेल्या क्षेत्राचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादी क्र.१ कडून वादीस देता आला नाही. पोलिस मदतीशिवाय प्रत्यक्ष कब्जा देता येत नाही असा अहवाल बेलिफ ने नि.१० वर दाखल केला आहे. जेडी क्र.१ आदेशाचे उल्लंघन करत आहे. त्यामुळे कब्जे वॉरंट बजावणीकामी बेलिफ व मोजणी अधिकारी यांना मागणी केल्याप्रमाणे पोलिस संरक्षण मिळणे आवश्यक आहे.

३. प्रस्तुत दरखास्तमध्ये जेडी यांना नोटीसबजावून देखील ते हजर झाले नाही. त्यामुळे दरखास्त त्यांचे विरुध्द एकतर्फा चालवण्याचा हुकूम झाला आहे.

४. प्रस्तुतचे दरखास्त जेडी यांनी रेदिमु नं.१४७/२०१६ च्या आदेशाप्रमाणे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केली आहे. नि.१० प्रमाणे बेलिफ व मोजणी अधिकारी यांना अतिक्रमीत कब्जाचा ताबा डीएचला देण्यापूर्वी आदेश दिले आहेत. नि.१० वरील मोजणी दाराचा पंचनामाचे अवलोकन केले असता मोजणीदाराने मोजणी करण्यास सुरवात केली असता प्रतिवादी सुभाष तुकाराम पाटील यांनी मोजणी करण्यास हरकत करु लागल्याने शांततेचा भंग होऊ लागल्याने पोलिसांशिवाय प्रत्यक्ष कब्जा देता येत नाही. तसेच बेलिफ याने दिलेल्या अहवालानुसार प्रतिवादी क्र.१ ने मोजणीदारास मी तुम्हाला मोजणी करु देणार नाही असे म्हणून अडथळा करु मोठमोठ्याने आवाज करु लागल्याने प्रत्यक्ष कब्जा देत आला नाही. तसेच पोलिसांशिवाय प्रत्यक्ष कब्जा देत येत नाही असा अहवाल दिला आहे. यावरुन वादीने दाखल केलेल्या

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी डीएचने मागणी केल्याप्रमाणे पोलिस संरक्षण देणे आवश्यक आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सांगोला पोलिस स्टेशन यांना डीएच यांनी मागणी केल्याप्रमाणे दोन पुरुष कॉन्स्टेबल व एक महिला कॉन्स्टेबल यांचे संरक्षण रे.मु.नं. १७४/२०१६ मधील आदेशाची अंमलबजावणी कामी डीएच, बेलिफ व मोजणीदार यांना योग्य ते भत्ता व फी भरल्यानंतर पुढील नेमलेल्या तारखेपर्यंत डीएच मागणी करतील तेव्हा एक दिवस देणेचे आहे.

३. सांगोला पोलिस स्टेशन यांना पत्र द्यावे.

४. डीएच यांनी योग्य ती पुर्तता पुढील तारखेच्या आत करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2024.10.17 11:40:57 +0530

सांगोला.
दिनांक:- १४/१०/२०२४

**( श्रीमती बी. एम. पोतदार )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 17/10/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 17/10/2024 |